# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## जाहिरात व परवाने विभाग
तळ मजला, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक- ४२२००२.

## जाहिर प्रकटन

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तमाम नागरिक, पदाधिकारी, राजकिय पक्ष, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा इ. संस्था व सर्व क्षेत्रातील मान्यवरांना कळविण्यात येते कि, शुभेच्छा, वाढदिवस, सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, धार्मिक व भावपुर्ण श्रध्दांजली इ. कार्यक्रमासाठी मनपा नाशिक सर्व विभागीय कार्यालयातील कार्यक्षेत्रामध्ये मुख्य चौक, रस्ते इ. ठिक-ठिकाणी मनपा मालकीच्या खुल्या जागेत १० चौ.फूट X १० चौ.फूट आकारमानाचे **तात्पुरता स्वरुपात जाहिरात शुभेच्छा फलक / जाहिराती लावणे / प्रसिध्द करणेकरीता जागा निश्चित केलेल्या आहेत.** सदर जागा / ठिकाणांची यादी मनपाचे www.nmc.gov.in या संकेतस्थळावर व मनपा नाशिक सर्व विभागीय कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार, व्यक्ती / अभिकरणे / संस्था यांनी मनपाच्या ज्या विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात तात्पुरता स्वरुपाचे जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. लावणे / प्रसिध्द करावयाची असल्यास संबंधित विभागीय कार्यालयाचे नागरी सुविधा केंद्रात विहित मुदतीत रितसर अर्ज दाखल करून संबंधित विभागाची परवानगी प्राप्त करून सदरच्या तात्पुरता स्वरुपाचे जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर / पोस्टर्स व आकाश-चिन्ह इत्यादींवर अर्जदाराचे नांव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण व परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा QR कोड दर्शनी भागावर प्रदर्शित करण्यात यावा. अशाप्रकारचे जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. जाहिराती अधिकृत मानण्यात येतील.

QR कोड दर्शनी भागावर प्रदर्शित न केलेले तसेच, मनपाने निश्चित केलेल्या जागा व्यतिरिक्त अनधिकृपणे उभारणी / प्रसिध्दी केलेले जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. अनधिकृत मानण्यात येतील. त्यामुळे सर्व नागरिक, पदाधिकारी, राजकिय पक्ष, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा इ. संस्था व सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी नियमाप्रामणे परवानगी घेऊन जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. जाहिराती उभारावे व नाशिक महानगरपालिकेस सहकार्य करावे.

तसेच, खाजगी / खाजगी जागेतील बांधकाम क्षेत्रामध्ये व मनपा जागेत विनापरवाना / अनधिकृतपणे कोणतीही परवानगी / लायसेंन्स न घेता आकाश-चिन्ह / जाहिरात फलक / तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. उभारणी केलेले आहेत. तसेच, ज्या आकाश-चिन्ह / जाहिरात फलकांचे नुतनीकरण कालावधी संपुष्ठात येऊनही त्यांचे नुतनीकरण न करता अनधिकृत स्ट्रक्चर उभारणी अथवा वापर केला जातो, अशा सर्व प्रकारचे आकाश-चिनह / जाहिरात फलक / तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. जाहिराती दि. ०६ सप्टेंबर, २०२३ पुर्वी संबंधितांनी स्वत:हून काढून घ्यावेत. दिलेल्या मुदतीत न काढल्यास जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. ३१/०१/२०१७ रोजीचे आदेशान्वये तसेच, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम, २४४ व २४५ व महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ इ. नुसार सर्व अनधिकृत आकाश-चिन्ह / जाहिरात फलक / जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. निष्कासित करून जप्त करणेची कारवाई करणेत येईल व सदर बाबत येणारा सर्व खर्च संबंधित अभिकरणांकडून नियमानुसार वसूल करणेत येईल. तसेच, महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डिफेंसमेंट

ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ नुसार गुन्हा दाखल करणेत येईल. सदर बाबत होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी अनधिकृतपणे सर्व प्रकारचे आकाश-चिनह / जाहिरात फलक / तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक / होर्डींग / फ्लेक्स / बॅनर व पोस्टर्स इ. उभारणारे व्यक्ती/अभिकरणे व संस्था यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(श्रीकांत पवार)
उपआयुक्त (कर)
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**

(डॉ. अशोक करंजकर भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**